प्रेसनोट दिनांक ११/०७/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे

## एका महीला आरोपीला अटक करुन गुन्हयातील चोरलेला माल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आणला

दिनांक १०/०७/२०१९ रोजी महिला नामे उदीता उदयन कर वय २७ वर्षे धंदा नोकरी रा. फ्लॅट नं ७०४, बेलाविस्टा, विमाननगर पुणे मुळ राहणार ७/१ए, सनी पार्क, राई एन्क्लेव्ह, फ्लॅट १०२ बी, कोलकत्ता वेस्ट बंगाल यांनी विमानतळ पोलीस स्टेशन येथे हजर होवुन फिर्याद दिलेत मजकुर की, त्यांचे घरामध्ये मोलकरीण म्हणुन काम करणारी महिला वय ३५ वर्षे रा. मुपो शिरवळ ता. अक्कलकोट जिल्हा सोलापुर हिने दि.०८/०७/२०१९ रोजी स.०९/३० वा ते दि. ०९/०७/२०१९ रोजी पहाटे ०२/०० वा चे दरम्यान त्यांचे राहते घराचे बेडरुमचे कपाटाचे ड्रॉव्हरमधील पर्समध्ये पी.एन.गाडगीळच्या बॉक्समध्ये ठेवलेली किं.रुपये ६३,०००/- ची एक सोन्याची डायमंड असलेली लेडीज अंगठी २.४४ ग्रॅम ०.३२ कॅरेट डायमंडची अंगठी त्यांचे संमतीशिवाय चोरुन नेलेली आहे वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. दाखल गुन्हयाचा तपास सहा पोलीस निरीक्षक श्री मुजावर विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांचेकडे दिल्याने त्यांनी दिनांक १०/०७/२०१९ रोजी त्याचे रायटर पोलीस नाईक केंगले व महिला पोलीस नाईक माळेकर यांचे मदतीने महिला नामे सखुबाई शिवाजी देवकर वय ३५ वर्षे रा. मुपो शिरवळ ता. अक्कलकोट जिल्हा सोलापुर हिला गुन्हयाचे कामी ताब्यात घेवुन तिला विश्वासात घेवुन तिचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने तपास करुन चोरीस गेलेले सोन्याचे अंगठीचा तपास केला असता तिने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने तिला गुन्हयामध्ये अटक करुन गुन्हयातील तिने चोरी केलेली सोन्याची अंगठी तिचेकडुन निवेदन पंचनाम्याने जप्त करुन वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी सदरचा गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास सहा पोलीस निरीक्षक मुजावर विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.